नि.फौ.ख.क्र. १५११/२०२५ नि.क्र. ३०

## भारतीय नागरिक सुरक्षा संहिता (BNSS), २०२३ चे कलम ३५१ प्रमाणे आरोपीचे निवेदन

| | | |
|---|---|---|
| आरोपी क्र. २ चे नाव | : | मंगेश वाल्मिक शहाणे |
| वय | : | १८ वर्षे |
| राहणार | : | सेंट फॉल, ता. पैठण, जि. छ. संभाजी नगर |

[टिपः– संबंधित प्रश्न तयार करणेकामी प्रस्तुत न्यायालयाने फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम ३१३(५) नुसार अभियोगपक्षातर्फे सहाय्यक सरकारी वकील श्रीमती सीमा शेख आणि आरोपीतर्फे वकील श्री. एस. ए. शेख यांचे सहाय्य घेतले असून, माननीय सर्वोच्च न्यायालयाचे राज कुमार वि. सरकार 2023 SCC OnLine SC 609 मधील न्यायनिर्देशांची पूर्तता केलेली आहे.]

प्र.क्र. १ तुमच्या विरुध्द आलेल्या पुराव्याबाबत आपणास खालील प्रश्न विचारण्यात येत असून त्याची उत्तरे देणे तुम्हास बंधनकारक नाही आणि प्रश्नाची उत्तरे न दिल्यास तुमच्यावर कोणतीही कारवाई होणार नाही. परंतु प्रश्नाच्या उत्तरात आपल्या विरूध्द एखादी बाब आढळून आल्यास ती बाब पुरावा म्हणून ग्राहय धरण्यात येईल. सदरची बाब तुम्हास समजली काय?

उत्तर. होय.

प्र.क्र. २ अभियोग पक्षातर्फे नोंदविण्यात आलेल्या साक्षीदारांची साक्ष आपणास समजली काय?

उत्तर. होय.

प्र.क्र. ३ अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. १ जगन्नाथ देशमुख यांच्या साक्षीत असे आले आहे की, दि. ३०/०७/२०२४ रोजी त्यांचे पत्नीने त्यांना सांगितले की, ती १०.१५ वा. शतपावली करत असताना पाठीमागुन कुणीतरी मोटार सायकलवरुन येऊन तिच्या गळ्यातील सोन्याचे मंगळसुत्र ओढुन नेले, त्यामुळे त्यांनी पोलीस स्टेशनला फिर्याद (नि.१७) दिली, याबाबत तुम्हाला काय सांगायचे आहे?

उत्तर. खोटे आहे.

प्र.क्र. ४ पुढे त्यांच्या पुराव्यात असे आले आहे की, दि. २४/०१/२०२५ रोजी पोलिसांनी त्यांना सदर गुन्हयात तुम्हाला अटक केली असुन तुम्ही त्यांचे पत्नीचे गळ्यातील

मंगळसुत्र ओढुन नेल्याचे सांगितले त्यामुळे त्यांचा पुरावणी जबाब नोंदविण्यात आला, याबाबत तुम्हाला काय सांगायचे आहे?

उत्तर. खोटे आहे.

प्र.क्र. ५ अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.२ अहिल्या देशमुख हिच्या पुराव्यात असे आले आहे की, दि. ३०/०७/२०२४ रोजी रात्री १०.३० वा. दरम्यान ती गणेश लॉड्री समोर शतपावली करत असताना पाठीमागुन कोणीतरी मोटार सायकलवर येऊन तिच्या गळयातील ७ ग्रॅम सोन्याचे मंगळसुत्र ओढुन नेले, याबाबत तुम्हाला काय सांगायचे आहे?

उत्तर. खोटे आहे.

प्र.क्र. ६ पुढे त्यांच्या पुराव्यात असे आले आहे की, तिने सदर बाब पतीला फोन करुन सांगितली व त्यांनी पोलीस स्टेशनला फिर्याद दिली, याबाबत तुम्हाला काय सांगायचे आहे?

उत्तर. खोटे आहे.

प्र.क्र. ७ पुढे त्यांच्या पुराव्यात असे आले आहे की, दि. २२/०१/२०२५ रोजी पोलिसांनी तिला फोन करुन तिच्या गळयातील मंगळसुत्र तुम्ही चोरुन नेल्याचे सांगितले व याबाबत तिचा पुरवणी जबाब नोंदविला, याबाबत तुम्हाला काय सांगायचे आहे?

उत्तर. खोटे आहे.

प्र.क्र. ८ अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. ३ सौरभ देशमुख यांच्या पुराव्यात असे आले आहे की, दि. ३०/०७/०२४ रोजी रात्री १०.३० वा. दरम्यान त्याचे आईने त्याला फोन करुन बोलावले व ती गणेश लॉड्री समोर शतपावली करत असताना कोणीतरी पाठीमागुन मोटार सायकलवरुन येऊन तिच्या गळयातील सोन्याचे मंगळसुत्र ओढुन नेल्याचे सांगितले, याबाबत तुम्हाला काय सांगायचे आहे?

उत्तर. खोटे आहे.

प्र.क्र. ९ पुढे त्यांच्या पुराव्यात असे आले आहे की, दि. २२/०१/२०२५ रोजी पोलिसांनी तिला फोन करुन तिच्या गळयातील मंगळसुत्र तुम्ही चोरुन नेल्याचे सांगितले व याबाबत तिचा पुरवणी जबाब नोंदविला, याबाबत तुम्हाला काय सांगायचे आहे?

उत्तर. खोटे आहे.

प्र.क्र. १० अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. ४ मनोहर रानडे यांच्या पुराव्यात असे आले आहे की, दि. ०१/०८/०२४ रोजी पोलिसांनी त्यांना समर्थ कॉलनी, गणेश लॉड्री समोर पंचनामा तयार करण्यासाठी बोलाविले होते. तेथे त्यांचे समक्ष घटनास्थळ (नि.२१) तयार करण्यात आला, याबाबत तुम्हाला काय सांगायचे आहे?

उत्तर. खोटे आहे.

प्र.क्र. ११ अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. ४ शैलेश पाटील यांच्या पुराव्यात असे आले आहे की, सदर गुन्हयाचा तपास त्यांचेकडे आदेश (नि.२४) प्रमाणे देण्यात आला, याबाबत तुम्हाला काय सांगायचे आहे?

उत्तर. माहिती नाही.

प्र.क्र. १२ पुढे त्यांच्या पुराव्यात असे आले आहे की,सदर आदेशासोबत त्यांना फिर्याद, एफआयआरची प्रत व दैनिक अहवाल देण्यात आला होता, याबाबत तुम्हाला काय सांगायचे आहे?

उत्तर. माहिती नाही.

प्र.क्र. १३ पुढे त्यांच्या पुराव्यात असे आले आहे की, त्यांनी फिर्यादचे अवलोकन करुन घटनास्थळ पंचनामा (नि.२१) दोन पंचा समक्ष केला, याबाबत तुम्हाला काय सांगायचे आहे?

उत्तर. खोटे आहे.

प्र.क्र. १४ पुढे त्यांच्या पुराव्यात असे आले आहे की, त्यांनी साक्षीदारांचे जबाब व पुरवणी जबाब नोंदविले, पुरवणी जबाबामध्ये तुमचे नावे निष्पन्न झाल्याचे फिर्यादीला कळविले, बाबत तुम्हाला काय सांगायचे आहे?

उत्तर. खोटे आहे.

प्र.क्र. १५ पुढे त्यांच्या पुराव्यात असे आले आहे की, तुमचा सदर गुन्हयातील सहभाग आढळुन आल्याने तुम्हाला त्यांनी परतुर जि. जालना येथील गुन्हयातुन सदर गुन्हयात वर्ग करुन घेतले व त्याबाबतचे पत्र (नि.२५) आहे, याबाबत तुम्हाला काय सांगायचे आहे?

उत्तर. खोटया गुन्हयामध्ये वर्ग केले आहे.

प्र.क्र. १६ पुढे त्यांच्या पुराव्यात असे आले आहे की, तुम्हाला घेऊन ते संभाजी नगर येथील सोनाराकडे गुन्हयातील मुद्देमालाची जप्ती करण्यासाठी गेले याबाबतचे पत्र नि. २६ प्रमाणे आहे, याबाबत तुम्हाला काय सांगायचे आहे?

उत्तर. माहिती नाही.

प्र.क्र. १७ पुढे त्यांच्या पुराव्यात असे आले आहे की, सदर गुन्हयातील तुमचा सहभाग निष्पन्न झाल्याने त्यांनी तुमच्या विरुध्द दोषारोपपत्र दाखल केले, याबाबत तुम्हाला काय सांगायचे आहे?

उत्तर. खोटे दोषारोपपत्र दाखल केले.

प्र.क्र. १८ अभियोग पक्षाचे साक्षीदार तुमच्या विरुध्द साक्ष का देतात?

उत्तर. माहिती नाही.

प्र.क्र. १९ तुम्हाला शपथेवर जबाब द्यावयाचा आहे का?

उत्तर. नाही.

प्र.क्र. २० तुम्हाला बचावाचे साक्षीदार तपासावयाचे आहेत काय?

उत्तर. नाही.

प्र.क्र. २१ तुम्हाला या केसबाबत आणखी काही जादा सांगावयाचे आहे काय?

उत्तर. खोटी केस दाखल केली आहे.

--------------

आरोपी क्र. २ ची सही / अंगठा

LAXMIKANT SUDAMRAO PADHEN

Digitally signed by LAXMIKANT SUDAMRAO PADHEN
DN: cn=LAXMIKANT SUDAMRAO PADHEN, ou=BOMBAY HIGH COURT,CID - 6946981, o=BOMBAY HIGH COURT, st=Maharashtra, c=IN
Date: 2026.04.13 15:40:49 +0530

(एल. एस. पाढेण)

दिनांक : १३/०४/२०२६ मुख्य न्यायदंडाधिकारी, अहमदनगर.

**प्रमाणपत्र**

प्रमाणित करण्यात येते की, आरोपीचा जबाब माझ्या समक्ष नोंदविला असून त्यातील मजकूर हा आरोपीने कथन केल्याप्रमाणे खरा व बरोबर आहे.

LAXMIKANT SUDAMRAO PADHEN

Digitally signed by LAXMIKANT SUDAMRAO PADHEN
DN: cn=LAXMIKANT SUDAMRAO PADHEN, ou=BOMBAY HIGH COURT,CID - 6946981, o=BOMBAY HIGH COURT, st=Maharashtra, c=IN
Date: 2026.04.13 15:40:58 +0530

(एल. एस. पाढेण)

दिनांक : १३/०४/२०२६ मुख्य न्यायदंडाधिकारी, अहमदनगर.